Swami Ramanand Teerth
Marathwada University
*"Dnyanteerth", Vishnupuri,*
**Nanded - 431 606 (M.S.)**

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ
*ज्ञानतीर्थ'' विष्णुपूरी,*
नांदेड–४३१ ६०६ (महाराष्ट्र)

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०१८–२०१९/१२८६ दिनांक: २७.०९.२०१८

प्रति,
मा.प्राचार्य तथा केंद्र प्रमुख,
सर्व संलग्नीत पदवी/पद्व्युत्तर महाविद्यालये प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: हिवाळी –२०१८ परीक्षा पूर्व तयारी बाबत.

महोदय,

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी–२०१८ पदवी परीक्षा दिनांक ०६.०९.२०१८ पासुन सुरू होत आहेत. परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात आले आहे. तसेच हिवाळी २०१८ परीक्षा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे उपाय योजना आपल्या परीक्षा केंद्रामार्फत करण्यात याव्यात.

१. हिवाळी परीक्षा २०१८ साठी परीक्षा केंद्राची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिर करण्यात आली आहे, त्यानुसार परीक्षार्थीसाठीची बैठक व्यवस्था व मनुष्य बळाचे नियोजन करण्यात यावे.

२. परीक्षा केंद्र प्रमुखाची जबाबदारी ही महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी स्विकारणे बंधनकारक असून अपवादात्मक परिस्थितीत इतर शिक्षकांची केंद्रप्रमुख म्हणुन नियुक्ती करण्यासाठी परीक्षा विभागाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे तसेच संवैधानिक जबाबदारी प्राचार्याचीच असेल. परीक्षा केंद्रप्रमुख/प्राचार्याचे नांव, फोन नंबर व ईमेल पत्ता इत्यादी माहिती दिनांक ०१.१०.२०१८ पर्यंत परीक्षा विभागास srtmundboee@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावी.

३. हिवाळी परीक्षा–२०१८ साठी विद्यापीठ स्तरावर सहकेंद्रप्रमुख नेमणुक करणेसंबधी आपल्या महाविद्यालयातील दोन सहा.प्राध्यापकांची नावे त्यांचे मोबाईल नंबर व ईमेल पत्ता इत्यादी माहिती परीक्षा विभागास दिनांक ३०.०९.२०१८ पर्यंत पाठविण्यात यावेत असे यापूर्वीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते ती नावे ०१.१०.२०१८ पाठवावित. बी.ए. व बी.एस्सी या अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठी अधिक कालावधी लागत असल्यामुळे या परीक्षा केंद्रावर पहिल्या २० दिवसांसाठी एक व त्यानंतरच्या कालावधीसाठी एक अशा दोन टप्प्यात सहकेंद्रप्रमुख देण्यात येईल. यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी नावे पाठवितेवेळी ज्या विषयाची परीक्षा आहे ते विचारात घेवून सहकेंद्रप्रमुखांची नावे पाठवावीत जेणे करून महाविद्यालय मुल्यांकनाच्या कामकाजात व्यत्यय येणार नाही.

४. हिवाळी परीक्षा २०१८ साठी विद्यापीठ स्तरावर भरारी /दक्षता पथकाची नेमणूक करणेसंबधी आपल्या महाविद्यालयातील तीन ते चार सहा.प्राध्यापकांची नावे, त्यापैकी एक महिला प्राध्यापक उपलब्ध असल्यास त्यांचे मोबाईल नंबर व ईमेल पत्ता इत्यादी माहिती पाठविण्यात यावे असे यापूर्वीच कळविण्यात आले होते. परंतु अद्याप सदर माहिती पाठविलेली नसल्यास दिनांक ०१.१०.२०१८ पर्यंत पाठवावित.

५. विद्यापीठ परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार घडू नये म्हणून महाविद्यालयीन स्तरावर दोन /तीन सदस्यीय अंतर्गत दक्षता पथकाची नेमणूक करण्यात यावी. त्यामध्ये एक महिला सदस्य असेल.

६. परीक्षा केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी विनामुल्य पोलिस बंदोबस्त घेण्याबाबत योग्य ती कार्यवाही महाविद्यालयीन स्तरावर करावी.

७. हिवाळी २०१८ परीक्षेसाठी प्रश्न पत्रिका हया Online E-Delivery मार्फत पाठविण्यात येणार आहे, त्यामुळे E-Delivery of Question Paper Downloading साठी स्वतंत्र गोपनीय कक्ष असणे आवश्यक असून त्यामध्ये अद्यावत संगणक, झेरॉक्स मशीन, प्रिंटर तसेच विद्युतपुरवठा अखंड राहणे करीता युपीएस/जनरेटर इत्यादी साहित्य उपलब्ध ठेवावे.

८. E-Delivery of Question Paper साठी स्वतंत्र गोपनीय कक्षात काम करणारे प्रशिक्षीत अधिकारी, कर्मचारी नेमणूक करून त्यांची नावे परीक्षा विभागास दिनांक ०१.१०.२०१८ पर्यंत कळवावे. तसेच गोपनीय कक्षात सीसीटीव्ही कॅमेरे चालू ठेवणे बंधनकारक आहे.

९. परीक्षा सुरक्षित व कॉपीमुक्त तसेच मोकळया वातावरणामध्ये पार पाडणेसंबधी परीक्षा केंद्राच्या प्रत्येक परीक्षा हॉलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यात यावे. जेणे करून परीक्षेदरम्यानच्या गैरप्रकारास आळा बसेल.

१०. परीक्षा केंद्रामध्ये परीक्षार्थींना प्रवेश देतांना त्यांची तपासणी करून परीक्षा दालनात प्रवेश देण्यात यावा. परीक्षा दालनात पेपर कॉपी (नक्कलेची प्रत), मोबाईल, कॅलक्युलेटर, इतर परीक्षेसंबधीची यांत्रिक उपकरणे गैरप्रकारासंबधीची साधने वापरण्यास सक्त मनाई करण्यात यावी.

११. ज्या महाविद्यालयात मान्यताप्राप्त प्राचार्य नसतील, आवश्यक सोयी सुविधा नसतील अशा महाविद्यालयाचे केंद्र इतर महाविद्यालयास देण्यात येइल. त्यानुसार बैठक व्यवस्था करावी लागेल. त्यासाठीचा प्रशासकीय खर्च प्रती विद्यार्थी प्रमाणे देय असेल.

कृपया वरील प्रमाणे पूर्वतयारी करावी व सदर माहिती परीक्षा विभागास दिनांक ०१.१०.२०१८ पर्यंत srtmundboee@gmail.com या इमेल किंवा खास दुतामार्फत किंवा डाकने परीक्षा विभागास पाठवून देण्यात यावी व हिवाळी २०१८ परीक्षा यशस्वीरित्या पार पाडणेसाठी सहकार्य करावे. .

१२. हिवाळी परीक्षेसाठी E-Delivery of Question Paper ची माहिती देण्यासाठी दिनांक ०१.१०.२०१८ रोजी कार्यशाळा विद्यापीठ अधिसभा सभागृह येथे आयोजीत केलेली आहे.

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ